**BDC LIBRARY**

**News Paper Clipping**

**A.Y. 2025-26**

# डॉ. सोपानराव चव्हाण यांनी शिक्षणातून तालुक्याचा कायापालट केला:प्रा.अनिल पाटील

पत्रकार प्रकाश कांबळे



**ग्रामोध्दार वृत्तसेवा**

**तारळे (प्रकाश कांबळे) :** डॉ. सोपानराव चव्हाण यांनी शिक्षण क्षेत्रात अत्यंत मोलाचे व दूरगामी कार्य केले आहे.त्याचे शिक्षण क्षेत्रातील काम हे एक दीपस्तंभाप्रमाणे मार्गदर्शक आहे. तालुक्यातील प्रत्येक मुलाने शिकले पाहिजे आणि त्यांना शहरातील मुलांप्रमाणेच दर्जेदार शिक्षण मिळाले पाहिजे, हीच त्यांची खरी तळमळ होती, असे प्रतिपादन प्रमुख पाहुणे व ग्रंथपाल प्रा अनिल पाटील यांनी केले.

ते कोयना एज्युकेशन सोसायटीचे संस्थापक डॉ. सोपानराव चव्हाण यांच्या ९१ व्या वाढदिवसानिमित्त आयोजित कार्यक्रमात ते बोलत होते. यावेळी प्राचार्य डॉ विलास कळंत्रे, प्रा दत्तात्रय थोरात, प्रा. विनायक माथने , प्रा सतीश गायकवाड, दिनकर देसाई याचे सह महाविधात्लातील प्राध्यापक शिक्षकेत्तर सेवक विधार्थी विधार्थिनी मोठ्या संख्येने उपोस्थित होते.

प्रा .अनिल पाटील यांनी पुढे की, डॉ. चव्हाण यांनी ग्रामीण व दुर्गम भागातील विद्यार्थ्यांसाठी शिक्षणाची दारे खुली केली. शिक्षणकार्य थांबवले नाही. ग्रामीण भागातील मुलांमध्येही अफाट क्षमता आहे, फक्त त्यांना योग्य संधी मिळाली पाहिजे, हा त्यांचा ठाम विश्वास होता. तालुक्यातील विद्यार्थ्यांना उच्च शिक्षण, आधुनिक संगणक शिक्षण तसेच रोजगाराभिमुख अभ्यासक्रम मिळावेत, यासाठी त्यांनी कोयना एज्युकेशन सोसायटीच्या माध्यमातून शाळा, महाविद्यालये व औद्योगिक प्रशिक्षण संस्थांची उभारणी केली. त्यामुळे तालुक्यातील आज हजारो विद्यार्थी शिक्षणाच्या मुख्य प्रवाहात आले आहेत, असेही अनिल पाटील यांनी नमूद केले.

प्राचार्य डॉ विलास कळंत्रे म्हणाले की या कार्यक्रमातून डॉ. सोपानराव चव्हाण यांच्या सामाजिक व शैक्षणिक कार्याला उजाळा देण्यात आला असून, त्यांच्या कार्यातून प्रेरणा घेऊन विद्यार्थ्यांनी उच्च ध्येय ठेवावे, आपण ज्या समाजातून आलो आहे त्या समाजासाठी काही तरी केले पाहिजे हा बोध आजच्या तरुणांनी घ्यावा असे सांगितले .यावेळी उपस्थित विधार्थ्याना संस्थेचे अध्यक्ष डॉ. सोपानराव चव्हाण याच्या वाढदिवसानिमित्त पेढे वाटले